# संयुक्त महाराष्ट्र चळवळ एक चिकित्सक अभ्यास

**प्रा. दादासाहेब बापूराव जाधव** इतिहास विभाग श्री संत गाडगेबाबा महाविद्यालय, कापशी, ता. शाहूवाडी, जि. कोल्हापूर.

.........................................................................................................

**घोषवारा**_ भारताच्या इतिहासात १९ व्या शतकास जेवढे महत्व आहे. तेवढेच महत्व २० व्या शतकासही आहे. कारण भारत पारतंत्र्यात जाण्याची घटना १९ व्या शतकात घडली असली तरी भारत स्वतंत्र होण्यासाठीच्या महत्वपूर्ण घडामोडी २० व्या शतकात घडल्या. संपूर्ण भारतावर ब्रिटीश अंमल निर्माण झाला. ब्रिटीशांनी प्रशासनाच्या सोईसाठी वर्चस्व मिळालेल्या प्रदेशाचे विभाग पाडले. उपरोक्त विषयाचे मुळ या ठिकाणी दडलेले आहे.२० व्या शतकात अनेक महत्वपूर्ण घटना घडल्या या घटनांपैकीच एक महत्वपूर्ण घटना म्हणजे 'संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती' होय. सदर विषयाचा आढावा संबंधीत शोध निबंधामध्ये घेण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

**संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा उगम :** संयुक्त महाराष्ट्र चळवळीची बीजे भारत पारतंत्र्यात असतानाच रुजलेली होती. कारण मराठी भाषिकांचा स्वतंत्र प्रांत असावा अशी मागणी २० व्या शतकाच्या सुरूवातीपासून असल्याचे आढळते. यासाठी कारणीभूत दोन महत्वपूर्ण घटना घडल्या. पहिली घटना इ.स. १९१३ मध्ये तेलगू तर इ.स. १९१६ मध्ये कन्नड अशा दोन वेगवेगळ्या भाषिकांचे राज्य निर्माण होण्यासाठी भरीव प्रयत्न सुरू करण्यात आलेले होते. पुढच्या कालखंडात इ.स. १९२० या वर्षी भाषावार प्रांत रचना निर्माण करण्यास कॉंग्रेस पक्षाने मान्यता दिली आणि याच वर्षी संपूर्ण देशात मुंबई आणि दिल्ली सोडून २१ प्रांतिक समित्या निर्माण करण्यात आल्या. भाषावार प्रांतरचनेच्या मागण्या सुरू असतानाच दुसऱ्या बाजूला भारताला स्वातंत्र्य मिळविण्याच्या चळवळी जागो जागी सुरू होत्या. दरम्यान सायमन कमिशनला विरोध सुरू होता. त्याच वेळी सर्व पक्षांची मिळून एक समिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला व त्यानुसार नेहरू समितीची स्थापना करण्यात आली. या समितीने आपला अहवाल सादर केला तो अहवाल 'नेहरू रिपोर्ट' या नावाने प्रसिद्ध झाला. या समितीच्या अहवालानुसार प्रातांची पूर्णरचना करण्यासाठी काही प्रमाण भौगोलिक व काही प्रमाणात आर्थिक परिस्थितीचा विचार करावा. मात्र हे करत असताना त्या ठिकाणाच्या लोकांची इच्छा व भौगोलिक प्रदेशाच्या सलगतेच्या दृष्ठिने प्रथम विचार करावा असे मत नेहरू रिपोर्टमध्ये मांडण्यात आले. दरम्यान स्वातंत्र्य चळवळीचा जोर वाढल्यामुळे प्रांतीक पुनर्रचना करण्याच्या प्रयत्नामध्ये शिथीलता निर्माण झाली. इ.स. १९३८ या साली पुन्हा प्रांतिक पूनर्रचनेसाठी जोर धरला. कारण बॅरिस्ट रामराव देशमुख यांनी मध्य भारत व वऱ्हाड प्रांताच्या विधी मंडळातून वऱ्हाड प्रांत अलग असावा आसा ठराव मांडला व त्यांनी तो मंजूर करून घेतला याचा परिणाम म्हणून मुंबई येथे मराठी साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले. या संमेलनाचे अध्यक्ष स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर होते. म्हणून वऱ्हाड प्रांताबरोबर मराठी भाषिकांचा मिळून एक प्रदेश असावा असा ठराव पास करण्यात आला हा ठराव म्हणजेच संयुक्त महाराष्ट्राचा ठराव होय. आशा रितीने संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा उगम झाला.[१]

**संयुक्त महाराष्ट्र चळवळीची वाटचाल :** बेळगाव येथे १९४६ या वर्षी ग. त्र्य.माडखोलकर यांच्या अध्यक्षतेखाली मराठी साहित्य संमेलन पार पडले. या संमेलनामध्ये संयुक्त महाराष्ट्रराज्याचा ठराव मंजूर करण्यात आला. पुढे 'संयुक्त महाराष्ट्र समिती' ची स्थापना करण्यात आली. या समितीचे अध्यक्ष म्हणून शंकरराव देव तर कार्याध्यक्ष म. म. दत्तो वामन पोतदार यांची नियुक्ती करण्यात आली. समितीने पुढील महत्वाची उद्दिष्ठे ठरविण्यात आली. १) भाषावार राज्यरचनेच्या तत्वानुसार मराठी भाषिकांचे सलग प्रदेश महाराष्ट्रात सामिल करणे.२)सामाजिक आर्थिक व राजकीय समता प्रस्थापित करून महाराष्ट्राची सरकारी तत्वानुसार उभारणी करणे. ३)लोकसत्ता व समाजवादी महाराष्ट्र स्थापन करणे.[२]

वरिल उद्दिष्ठे डोळ्यासमोर ठेवून संयुक्त महाराष्ट्राची मागणी याचा अर्थ सर्व मराठी भाषिक प्रदेश एकत्र आणून त्या प्रदेशाचे नामकरण महाराष्ट्र असे करावे. याच वेळी 'लोकशिक्षण' या मासिकात १९१७ मध्ये 'तिभंगलेला महाराष्ट्र' या शिर्षकाखाली प्रा. विठ्ठल वामन ताम्हणकर यांनी एक लेख प्रकाशित केला. हा लेख विशेष म्हणजे नकाशासहित प्रकाशित करण्यात आला होता. नकाशा बरोबरच मुंबई प्रांत, मध्य प्रांत, वऱ्हाड आणि हैद्राबाद संस्थानामधील मराठवाडा इ. ठिकाणांचा मराठी भाषिक प्रदेश एकत्र आणावा

आणि एकसंघ महाराष्ट्र निर्माण करावा या विचारा नंतर आचार्य विनोबा भावे, धनंजय गाडगीळ, प्रबोधनकार ठाकरे, ग.त्र्य. माडखोलकर, दत्तो वामन पोतदार, लालजी पेंडसे, मिरजकर या सर्व मान्यवरांनी संयुक्त महाराष्ट्र समितीची स्थापना व गरज यासाठी प्रयत्न सुरू केले.[३] या समितीच्या स्थापने नंतर महाराष्ट्र राज्य निर्मितीसाठिच्या संघर्षाची दिशा व साधने ठरविण्यात आली ती पुढील प्रमाणे. १) महाराष्ट्र राज्य निर्मितीसाठी लोकशाही संमत शांततामय साधनांचा उपयोग करणे.२)जनजागृती व संघटना करून पर्यायी शक्ती निर्माण करणे.३)महाराष्ट्राच्या मुलभूत समस्या लक्षात घेवूनआणि आर्थिक औद्योगिक व शेती विषयक सर्वांगीण विकासाच्या योजना तयार करून शिक्षणाच्या व आंदोलनाच्या मार्गाने त्या कार्यवाहित आणने.[४]आशा रितीने या संमेलनाच्या दिशा ठरवून आंदोलनास सुरूवात करण्याचे ठरविण्यात आले.

**संयुक्त महाराष्ट्र परिषद :** मुंबई येथे २८ जुलै १९४६ या दिवशी 'सर्व पक्षिय एकीकरण परिषद' भरविण्यात आलेली होती. या परिषदेचे अध्यक्ष शंकराव देव होते. या परिषदेचा मुळ उद्देश असा होता की, घटना समिती समोर वरील सर्व पक्षिय एकिकरण परिषदेच्या सदस्यांनी सर्वानुमते महाराष्ट्राच्या एकीकरणाची मागणी करण्यासाठीच भरविण्यात आलेली होती. याच परिषदेच्या वेळी नवाकाळ चे संपादक य. कृ. खाडिलकर यांनी मुंबई ही संयुक्त महाराष्ट्राची राजधानी असावी अशी उपसुचना सुचविलेली होती. मात्र शंकरराव देव यांनी खाडिलकर यांची उपसुचना न वाचताच या

सुचनेस नियमात बसत नाही असे जाहिर केले गेले [५] कारण शंकरराव देव संयुक्त महाराष्ट्र परिषदेचे अध्यक्ष होते. वास्तविक पहाता ही परिषद सर्व पक्षिय सदस्यांची होती. तरीही या परिषदेवर काँग्रेस पक्षाचे सर्वस्व होते. आणि शंकरराव देव काँग्रेस पक्षाचे उमेदवार होते. परिणामी या परिषदेमधून काहीही साधणार नव्हते. कारण महाराष्ट्रातील काँग्रेसच्या नेत्यांना काँग्रेस पक्षाच्या विरोधात जाता येत नव्हते. दरम्यान केंद्रातील बड्या नेत्यांची भूमिका भाषावार प्रांतरचनेच्या विरोधात होती. यामध्ये प्रामुख्याने नेहरू, सरदार पटेल, मौलाना आझाद, राजाजी , आचार्य कृपालनी इ. नेत्यांना भाषावर प्रांतरचनेची गरज वाटत नव्हती. यासाठी महत्वाचे कारण म्हणजे १९४६ साली फाळणीच्या नावाखाली जातीय दंगली उसळल्या होत्या.[६] १० डिसेंबर १९४८ या दिवशी दार कमिशनचा अहवाल प्रसिद्ध होवून या अहवालामध्ये श्री दार यांनी भाषिक राज्याची कल्पना लोकमान्य झालेली होती व ती दृढ झालेली आहे असेही मत अहवालात मांडले गेले. मात्र दार कमिशनच्या अहवालावर काँग्रेसने विरोध दर्शविला आणि या प्रश्नासाठीजे.व्ही.पी. समिती नेमली होती. जे.व्ही.पी. समिती म्हणजेच जवाहरलाल नेहरू, वल्लभाई पटेल व पट्टाभी सितारामय्या इ. होय. परंतू या समितीने भाषावार प्रांतरचनेच्या विरोधात मत व्यक्त केले व तसा विचारही व्हावा असे विरोधाभासाचे मत व्यक्त करण्यात आलेले होते.[७] मराठी माणसाच्या संयुक्त महाराष्ट्राबद्दल असणाऱ्या आशा जे.व्ही.पी. कमिटीमुळे धुळिस मिळाल्या. म्हणून मराठी माणूस संयुक्त महाराष्ट्रासाठी समर्थपणे लढा देण्यासाठी उभा राहिला. मुळात मुंबई महाराष्ट्राला देण्यास ही नकार दर्शविण्यात आलेला होता. म्हणून मुंबई महापालिकेचा ठराव ५० विरुद्ध ३५ मतांनी पास करण्यात आला. दरम्यान आत्रे व भंडारे यांनी भाषेच्या आधारावर मुंबई ही राजधानी असलेला महाराष्ट्र प्रांत ताबडतोब बनविला जावा असे ही मत नमूद करण्यात आले. त्यामुळे मुंबईसह महाराष्ट्र निर्मितीच्या आशा दृढ होऊ लागल्या.[८]

**संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे आंदोलन उग्र :**मुंबई येथे ७ नोव्हे १९५५ या दिशवी संयुक्त महाराष्ट्र या प्रश्नावर कामगार संस्था व राजकीय पक्ष यांचे आधिवेशन भरले. या अधिवेशनाचे अध्यक्ष कॉ. डांगे होते. या अधिवेशनामध्ये मुंबई विदर्भासह महाराष्ट्राचा ठराव मंजूर करण्यात आला. पंडित नेहरू यांनी मांडलेल्या पर्यायांशी जुळत असणारा पर्याय ८ नोव्हें. १९५५ रोजी तीन स्वतंत्र राज्याचा ठराव करण्यात आला. काँग्रेसच्या या त्रिराज्य योजनेस विरोध करण्यात आला. काँग्रेस च्या विरोधात संप करण्याचे धोरण ठरविण्यात आले.

**दिल्ली येथील मोर्चा : महाराष्ट्रातील स्त्रियांचा सहभाग :**दिल्ली येथे २७ जुलै १९५६ या दिवशी मोर्चा काढण्यात आला. या मोर्चामध्ये २२०० सत्यागृही सहभागी झालेले होते. २२०० सत्यागृही पैकी महाराष्ट्रातून २५० स्त्रिया सहभागी झाल्या होत्या. मोर्चामध्ये अनेक स्त्रियांना अटक करण्यात आले होते. या अटक केलेल्या स्त्रीयामध्ये पार्ल्याच्या आजीबाई, ६० वर्षे ओलांडून गेलेल्या अन्नपुर्णाबाई भांडारकर, माई एरंडे इ. होय. तर लहान मुलं असणाऱ्या स्त्रीया ही या मोर्चामध्ये सामिल झालेल्या होत्या.[१०]

**वृत्तपत्रांची कामगिरी :**मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र असावा अशा मागणीसाठी पाठिंबा देणारी अनेक मराठी वृत्तपत्र होती. या मध्ये दैनिक नवाकाळ, मौजविविधवृत्त ही साप्ताहिके तर पुण्याचे केसरी, वा. रा. कोठारी यांचे प्रभात इ. होय. [११] संयुक्त महाराष्ट्र चळवळी विषयी अनेक महत्वाच्या बातम्या या वृत्तपत्रांमधून प्रकाशित केल्याजात असत. जनमताचा कौल मुंबईसह महाराष्ट्र असावा असा होता. दरम्यान मराठी-गुजराती भाषिकांचे द्विभाषिकमुंबई राज्य निर्माण करण्यात आले. या द्विभाषिक मुंबई राज्यात महाराष्ट्र व सौराष्ट्र इ. प्रदेशांचा समावेश करून मुंबई ही या द्विभाषिक राज्याची राजधानी ठेवण्याचा निर्णय घेतला गेला. पुन्हा संयुक्त महाराष्ट्र समितीने द्विभाषिक राज्याविरोधात प्रखर जन आंदोलने करण्यात आली आणि याच प्रश्नावर संयुक्त महाराष्ट्र समितीने १९५७ मधील निवडणूका लढविल्या. या निवडनुकामध्ये १४७ जागा संयुक्त महाराष्ट्र समितीच्या बाजूने मिळाल्या. निवडणूकामधील या यशामुळे पंतप्रधान नेहरू यांना फेरविचार करण्याशिवाय पर्याय उरला नाही. म्हणून बड्या नेत्यांनी स्वतंत्र मराठी भाषिकांच्या मुद्द्यावर विचार केला आणि समितीतील एस.एम. जोशी, ना. ग. गोरे, कॉ. डांगे, आचार्य आत्रे, यशवंतराव चव्हाण यांनी द्विभाषिक राज्य संपुष्टात आणून विदर्भ-मराठवाडा सहित १ मे १९६० रोजी मुंबई सह महाराष्ट्राची निर्मिती करून संयुक्त महाराष्ट्र चळवळीस पूर्णविराम दिला. मा. यशवंतरावजी चव्हाण आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार म्हणून नावाजले गेले.[१२]

**सारांश :**अशा रितीने संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा लढा यशस्वी करण्यात आला. आधुनिक महाराष्ट्राची निर्मिती अतिशय कठिन परिस्थितीमधून झालेली होती. संयुक्त महाराष्ट्र होण्यासाठी अनेकांनी मिळेल त्या मार्गाने प्रतिकार केलेला होता. या राष्ट्रवीरांना महाराष्ट्राचा सदैव सलाम राहिल.

**संदर्भ ग्रंथ सुची**

१) डॉ. भोसले अरूण (बीजभाषण)- संशोधन सातारा इतिहास संशोधन मंडळ, सातारा, राज्यस्थरिय, दुसरे अधिवेशन-२०११
२) प्राचार्य कदम य. ना अंतर राष्ट्रीय राजकारणात भारत फडके प्रकाशन, कोल्हापूर पृष्ठ क्र. १४१
३) पाटील विलास-महाराष्ट्र शासन व राजकारण पृष्ठ क्र. २७
४) प्रा. मोरे दिनेश-आधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास (१८१८-१९६०) के. एस. पब्लिकेशन, पुणे,२००६ ५) उपरोक्त-पृष्ठ क्र. २५८
६) उपरोक्त - पृष्ठ क्र. २५९ ७) उपरोक्त-पृष्ठ क्र. २६२
८) उपरोक्त-पृष्ठ क्र. २६५
९) प्राचार्य कदम य. ना.-उपरोक्त पृष्ठ क्र.१४८
१०) पेंडसे लालजी-महाराष्ट्र मंथन, लोक वाङ:मय गृह, मुंबई, २०१०पृष्ठ क्र. ४२६
११) जोशी स. श्री-संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन
१२) प्राचार्य कदम य. ना.-आधुनिक भारत, फडके प्रकाशन, प्रथमावृत्ती, २००५पृष्ठ क्र. ४२३,४२४